# <u>महाराष्ट्र शासन</u>

**लोकलेखा समिती बैठक प्राथम्य**
दुरध्वनी क्रमांक ०२२- २२०१७१०६
E mail - sopr४.rdd-mh@nic.in

क्र.लोलेस २०१५/प्र.क्र.२८६/पंरा४
ग्रामविकास व जलसंधारण विभाग,
बांधकाम भवन, २५ मर्झबान पथ,
फोर्ट, मुंबई -४०० ००१.
दिनांक : १६ जुलै, २०१६

प्रति,

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, सर्व.

विषय- लोकलेखा समितीच्या सन २०१५-१६ मधील आठव्या अहवालातील शिफारशींवर तात्काळ कार्यवाही करणेबाबत.

महोदय,

लोकलेखा समितीच्या सन २०१५-१६ मधील आठव्या अहवालातील या कार्यासनाशी संबंधित शिफारस क्रमांक १.९२ - २. पुढीलप्रमाणे आहे :-

*"ग्रामपंचायतीकडील निधी आरटीजीएस द्वारे जिल्हा ग्राम विकास निधी (जि.ग्रा.वि.नि.) मध्ये जमा करता येईल काय याबाबत विभागाने सखोल अभ्यास करुन सर्व जिल्हा परिषदांना सूचना निर्गमित कराव्यात व तसे समितीस अवगत करावे अशी समितीची शिफारस आहे".*

**तरी, मा. लोकलेखा समितीच्या उपरोक्त शिफारशीच्या अनुषंगाने ग्रामपंचायतीकडील निधी आरटीजीएस द्वारे जिल्हा ग्राम विकास निधी (जि.ग्रा.वि.नि.) मध्ये जमा करता येईल काय, याबाबत तसेच, महाराष्ट्र जिल्हा (ग्रामविकास निधीबाबत) नियम, १९६० मध्ये सुलभता येण्यासाठी आवश्यक सुधारणांबाबत सखोल अभ्यास करुन आपले सविस्तर व स्वयंस्पष्ट अभिप्राय तात्काळ शासनास सादर करण्यात यावेत. प्रस्तुत प्रकरणी लोकलेखा समिती प्राथम्य विचारात घेवुन आपण कृपया व्यक्तिश: लक्ष घालून, सर्वप्राथम्याने कार्यवाही करावी, ही विनंती.**

आपला

( संतोष कराड )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.